RNI No: MAHMAR/2004/13776 :: Postal Registration No: MH / MR / NW-35 / 2014-2016
Published On : 12 July 2016 :: Posted at Kandivli(W) Post Office, Mumbai on 14 July, 2016

अजायब ✵ बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : चौदा | अंक : पहिला | जुलै २०१६

ऐहे ते देश पराया ओऐ सजणा (भजन) 4

बाबाजींचा अखेरचा संदेश (संदेश) 5

महात्म्यांचे आगमन (सत्संग) 15

धैर्यवान बना व योग्य वेळेची प्रतिक्षा करा (संदेश) 25

निरोप संदेश (संदेश) 29

खरे खोटे (गोष्ट) 32

धन्य अजायब (सत्संगाच्या कार्यक्रमांची माहीती) 34

मालक, मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व संपादक श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई - 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई - 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.

ऐहे ते देश पराया ओऐ सजणा

परम संत अजायब सिंहजी महाराजांनी रचलेले एक भजन



ऐहे ते देश, पराया ओऐ सजणा,
तू प्यार क्यों ऐना, पाया ओऐ सजणा (२)
ऐहे ते देश, पराया ओऐ सजणा,

आया जो ऐत्थे, सब ने तुर जाणा,
रहना ना ऐत्थे, कोई राजा राणा, (२)
जिंदगी बिरछ दी, छाया ओऐ सजणा,
तू प्यार क्यों ऐना ....

कोई दिन ऐत्थे, रैण बसेरा,
झूटे सब नाते, कोई ना तेरा, (२)
सतगुरु ने, समझाया ओऐ सजणा,
तू प्यार क्यों ऐना ....

करके सिमरन, मन समझा लै,
भुल्लां गुरु तों, माफ करा लै, (२)
दाते दा नां क्यों, भुलाया ओऐ सजणा,
तू प्यार क्यों ऐना ....

पल्ला गुरु, कृपाल दा फड़ लै,
भवसागर तों, 'अजायब' तूं तर लै, (२)
झूठा जगत, झूठी माया ओऐ सजणा,
तू प्यार क्यों ऐना ....

कठीण शब्दांचा भावार्थ:

तुर जाणा : निघून जाणे, बिरछ : वृक्ष
नां : नाम, फड़ : पकड

बाबाजींचा अखेरचा संदेश

परमसंत अजायब सिंहजी महाराजांनी प्रेमींना अखेरीस दिलेला
एक महत्वपूर्ण संदेश

जसे आपण सर्व प्रेमींना कल्पना आहे की आपले प्रिय बाबाजी, ६ जुलै रोजी रात्री ११ वाजून ५५ मिनिटांनी, आपले देहस्वरूप त्यागून त्यांचे प्रिय सतगुरू कृपालजींकडे गेले आहेत. महाराज कृपालजींच्या आठवणीत व त्यांच्या विरहात बाबाजी क्षणोक्षणी तळमळत असत.

दिल्लीमधील मे महिन्यातील कार्यक्रमानंतर जेव्हा बाबाजी १६ पी.एस. आश्रमात आले तेव्हापासूनच बाबाजींच्या प्रकृतीमध्ये किरकोळ त्रास होत होता, जो थोड्याफार उपचारांनी ठीक होत असे. उन्हाळ्यातील अति गर्मी व प्रकृती अस्वास्थ्यामुळे बाबाजींनी प्रेमींशी गाठ–भेट घेणे कमी केले होते.

६ जुलै रोजी सकाळी गुरमेल सिंह औषधे आणण्यासाठी रायसिंहनगर येथे निघाले असता बाबाजी त्यांना म्हणाले,''माझ्या हृदयावर अतिशय ताण आला असल्याने व अशक्तपणामुळे मी या वर्षीचा परदेश दौरा करू शकणार नाही. शक्य झाल्यास तू फोन करून पप्पुस याबद्दल माहिती दे.''

सकाळी ९ वाजता बाबाजी म्हणाले की आपण रायसिंहनगर येथील डॉक्टरांकडे जाऊन माझी शारीरिक तपासणी करून घेऊ जेणेकरून कसली शंका असल्यास ती दूर होईल. रायसिंहनगर येथे जाऊन डॉक्टरांनी तपासणी केल्यावर सर्वकाही ठीक आहे फक्त अशक्तपणा आहे, असे म्हणून घरी जाऊन ग्लुकोज लावण्यासाठी सांगितले. त्यानुसार आश्रमात येऊन ग्लुकोज लावले गेले आणि त्यानंतर संध्याकाळी बाबाजी एकदम बरे झाले.

संध्याकाळी ५.३० वाजता पप्पूस बोलावून त्यांनी सांगितले,''मी आता बरा आहे. परंतु अशक्तपणामुळे या वर्षी परदेशाचा दौरा करू शकणार नाही. तू जाऊन प्रेमींना माहिती दे की कृपालजींना जर माझ्याद्वारे कार्य करवून

घ्यायचे असल्यास पुढच्या वर्षी मे महिन्यामध्ये कार्यक्रम करू; अखेरीस एके दिवशी हा शरीररूपी पिंजरा सर्वांना रिकामी करून जायचेच आहे.'' त्यावेळी बाबाजी एकदम ठीक होते. बाबाजी जवळजवळ १५-२० मिनिटे आमच्याशी हसत-हसत बोलत होते आणि आम्हांस देखील त्यांनी हसवले. त्यावेळी गुरमेल सिंह देखील तेथे बसलेले होते.

रात्री बाबाजींनी स्वइच्छेनुसार थोडेफार जेवण घेतले आणि ९ वाजता ते पहुडले. रात्री १०.३० वाजेपर्यंत ते झोपले होते. १०.३० वाजता अचानक उठून ते म्हणाले, माझ्या काळजामध्ये जळजळ होत आहे. अजित सिंह आणि निर्मल सिंह त्यावेळी बाबाजींच्या जवळच बसले होते. त्यांनी बाबाजींना बाथरूमसाठी नेले. अंदाजे ११.१५ वाजता बाबाजींना श्वास घेण्यास त्रास होऊ लागला तेव्हा गुरमेल सिंहना बोलावले गेले. गुरमेल सिंहनी बाबाजींना तपासले तेव्हा सर्वकाही ठीक होते. त्यांनी बाबाजींना विचारले,''डॉक्टरांकडे जाऊया का?'' बाबाजी म्हणाले,''होय चला! मी आता थकलो आहे.''

तत्काळ बाबाजींना डॉक्टरांकडे नेण्यात आले. तपासणी करून डॉक्टरांनी बाबाजींना जीभ दाखविण्यास सांगितले. बाबाजींनी आपले डोळे उघडले आणि डॉक्टरला जीभ दाखविली. डॉक्टरने हृदयतज्ञास बोलावले. बाबाजींना ऑक्सिजन लावण्यासाठी ऑपरेशन थिएटरकडे नेऊ लागले. बाबाजींनी त्याच क्षणी स्वत:स आकसून घेतले व ते परमपिता कृपालजींमध्ये विलीन झाले.

खरेतर आपणांस बाबाजींनी नेहमीच इशारा दिला होता, परंतु आपण समजूनही नासमज बनून राहिलो. काही दिवसांपूर्वी बाबाजींनी एक भजन लिहिले होते. अगोदर ते भजन गुरमेल सिंह यांना देऊ लागले, मग ते सांगू लागले की आता नाही, नंतर ते भजन देईन. तेच भजन त्यांनी बलवंतला वाचून दाखविले. बलवंतला गहिवरून आलेले पाहून बाबाजी म्हणाले की तुला वाटते तशी गोष्ट नाही. जे लोक माझ्या प्रकृती-स्वास्थाबद्दल भविष्यवाणी करतात, पत्र आणि तार पाठवितात, त्यांना शांत करण्यासाठी मी हे भजन

लिहिले आहे, बाकी तुला वाटते तशी गोष्ट नाही. असे सांगत त्यांनी बलवंतची समजूत तर घातली, परंतु भजनामध्ये त्यांनी जे काही लिहिले होते, ते नेमके तेच करून गेले. ते भजन पुढीलप्रमाणे आहे:

कौन कहे मैं मर जाणा है,
मैं तां कृपाल घर जाणा है,

लम्मां चौड़ा सागर जेहड़ा,
होले–होले तर जाणा है,

जीवन दी राह विच आई,
मौत मोई ने मर जाणा है,

जीवन दे नक्शे अंदर,
रंग सावन दा भर जाणा है,

वड्डी सारी उमरां भोगी,
रहना नहीं ऐं घर जाणा है,

कृपाल दी चर्चा होंणी है,
जा जीन्नां नाम जप जाणा है,

कोई मेरा राह ना रोके,
जाणा है सचमुच जाणा है,

तोरो मैनूं हसके तोरो,
अपने ही मैं घर जाणा है,

जद वी चाहेगा 'अजायब',
खाली पिंजर कर जाणा है,

बाबाजींनी अशा स्थितीच्या संदर्भात गुरमेल सिंहना वारंवार सांगितले की, ''ज्याप्रमाणे मी येथे सत्संगाचा कार्यक्रम चालविला आहे, तसाच कार्यक्रम

तू पुढे चालू ठेवावास. मी जो मार्ग दर्शविलेला आहे, त्यामार्गावर श्रद्धापूर्वक चालत राहिल्यास परमात्मा कृपाल स्वत:च तुला मार्ग दाखवतील. कोणत्याही भानगडीत (वाद–विवादात) पडू नकोस. जो प्रेमी येथे श्रद्धापूर्वक येईल त्यास तितकाच लाभ मिळेल जितका मी देहरूपात असताना मिळत होता.''

त्यामुळे आपण सर्व बंधु–भगिनींचे कर्तव्य आहे की आपण बाबाजींच्या या आदेशाचे पालन करावे. ज्याप्रमाणे बाबाजींनी सांगितले आहे त्याप्रमाणेच येथे महावारी सत्संगाचा कार्यक्रम चालू राहिल. सर्व प्रेमींनी श्रद्धेने व प्रेमभावनेने यावे व बाबाजींच्या सांगण्यानुसार कार्यक्रमात सहभागी व्हावे. सर्व प्रेमींनी आप–आपल्या घरी, आप–आपल्या जागी पूर्वीप्रमाणेच कार्यक्रम चालू ठेवावा. कोणत्याही वाद–विवादामध्ये पडू नये.

बाबाजी आपल्या सोबतच आहेत. जसे बाबाजींनी सांगितले आहे, जर तुम्ही मी सांगितलेल्या मार्गावर चालत राहाल तर परमात्मा कृपाल स्वत:च तुम्हास मार्ग दाखवतील. बाबाजींची शक्ती कोठे ना कोठे नक्कीच प्रगट आहे, जर आपण त्यांनी सांगितलेल्या मार्गावर चालत राहिलो, तर ते नक्कीच कृपा करून आपल्याला मार्ग दाखवतील.

सप्टेंबर १९८६ मध्ये बाबाजींची प्रकृती खूप बिघडली होती. त्यावेळी एके दिवशी बाबाजींनी गुरमेल सिंह आणि बलवंतला बोलावून सांगितले की मला काही सांगावयाचे आहे आणि टेपरेकॉर्डर मागवून त्यांचा एक संदेश रेकॉर्ड केला होता. त्यानंतर ती टेप बलवंत आणि गुरमेल सिंह यांनी कधीच ऐकली नाही, कारण ते कधी पटलेच नव्हते आणि हृदय त्यावर विश्वास ठेवण्यास राजीच नव्हते. ती टेप येथे उपलब्ध असून, आता सर्वांना ऐकवली जाईल. आम्हांस असे वाटते की तो बाबाजींचा आपल्यासाठी असलेला अखेरचा आज्ञा संदेश आहे. हा संदेश सर्वच संगतसाठी दिला गेलेला आहे. हा संदेश आपण सर्व बंधु–भगिनींनी अतिशय लक्षपूर्वक ऐकून, त्याचे आकलन करून घेणे अतिशय गरजेचे आहे.

***

बाबाजी (टेप) : मी जे काही सांगत आहे, ते सर्व मी माझे गुरू सावन–कृपालजींच्या कृपेनेच बोलत आहे. जमाना अतिशय भयावह आहे, संसारात सर्वांची मने भरकटून गेली आहेत. सर्वजण नामाची कमाई करण्यास टाळत आहेत, परंतु गुरू बनण्यासाठी मात्र सगळे टपलेले आहेत. मी खूप प्रेमींना नामदान दिलेले आहे. माझ्या सतगुरूंनी मला जे कार्य करण्यास सांगितले, ते कार्य मी अतिशय ईमानदारीने आणि खऱ्या अंत:करणापासून केले आहे.

माझ्या सतगुरूंचा अंतरातून माझ्यासाठी असा कधीच आदेश मिळाला नाही की अमुक दिवशी, अमुक वेळी मी हे जग त्यागावे. संत असा चमत्कार कधी करत नाहीत, कधी असा बाहुला–बाहुल्यांचा खेळ करीत नाहीत. मी अनेक महिन्यांपासून हे सर्व सांगण्याचा विचार करीत होतो. जेव्हा संत देहत्याग करतात, जसे माझे गुरू सावन–कृपालजींनी देहत्याग केल्यानंतर अनेक पार्ट्या बनल्या. त्यांच्या जमीन–जुमल्यासाठी लोकं न्यायालयामध्येही गेले, तेव्हा इतर लोकांना हसून टर उडविण्याची संधी मिळाली की हे परिपूर्ण गुरूंचे शिष्य असूनही आप–आपसांमध्ये भांडण–तंटा करीत आहेत. माझ्या गुरू कृपालजींनी सांगितले होते की कोर्टात जाऊ नका परत या, कोर्टात न जाण्यातच तुमचे हित आहे.

मी नेहमीच माझ्या सेवकांना इशाऱ्या–इशाऱ्याने सावध करीत राहिलो, परंतु दुर्दैवाने कोणीच त्यावर लक्ष दिले नाही. जीवन अधिकाधिक कष्टप्रद होत चालले आहे. हे शरीर काही यंत्र नाही की जे सातत्याने सदैव कार्यरत राहिल. अखेरीस ते कार्यरत राहण्याची देखील काही सीमा असते.

मी हे सर्व माझ्या गुरूदेवांच्या हुकूमावरून बोलत आहे की कोणीही नकली गुरूबाजीचे ढोंग रचू नये आणि कोणत्याही सत्संगीने नकली व ढोंगी गुरूंमागे लागू नये. प्रत्येक चुकीचा हिशोब द्यावा लागतो. मी माझ्या अनुभवावरून सांगतो की गुरुबाजीचे ढोंग रचून नाम देण्याची अत्यंत कठोर सजा मिळते. संतांच्या वाणींमधूनही लक्षात येते की नकली गुरू तसेच नकली शिष्यांना

कठोराहून कठोर शिक्षा केली जाते. हे मी अनेक सत्संगांमध्येदेखील विदित केलेले आहे. सुंदरदासाचे महाराज कृपालजींच्या सोबत आलेले अनुभव मिस्टर ओबेरॉय यांनी जसेच्या तसे त्यांच्या पुस्तकामध्ये नमूद केलेले आहेत. प्रत्येकजण ते पुस्तक वाचून खात्री करून घेऊ शकतो. संतांचे लेखन आपणांस घाबरविण्यासाठी नसते आणि ते आपणांस एखादी लालुचदेखील देत नाहीत.

संगतमध्ये सत्याच्या बीजाचा नाश होत नाही. येथे मला समजून घेणारे सत्संगीदेखील आहेत. येथे आश्रमामध्ये माझ्या मुलांनी, लाला कुटुंबियांनी खूप सेवा केली आहे, ज्याची मी कदर करतो. मी लाला यांना वडिलांसमान मानून त्यांच्यावर प्रेम केले. परंतु दुर्दैव! त्यांना तीस वर्षे समजावत राहूनही त्यांनी प्रयत्न केले नाहीत. हुजूर कृपाल सांगत असत,''प्रेम एकाबाजूनेच नव्हे, दोहोबाजूंनी व्हावयास हवे. अग्नीच्या ज्वालेवर भुंगा प्रेम करीत असतो. परंतु त्याची ज्वालेस कल्पना नसते. त्यामुळे भुंगा जेव्हा ज्वालेच्या संपर्कात येतो, तेव्हा तो जळून जातो.''

मी माझ्या मुलांची खूप कदर करतो. गुरमेल, बलवन्त आणि बलवन्तचे लहान बाळ सुखपाल यांनी नेहमीच माझ्यावर प्रेम केले. संतांचा नियम आहे की अमुक एका व्यक्तीने गुरू बनून कार्य करावे असा ठेवा त्या व्यक्तीसाठी परमात्म्याने ठेवला असल्यास तो ठेवा संत त्या व्यक्तीस नक्कीच देतात. तुम्ही पृथ्वीची गोष्ट वाचून पाहू शकता. वाणीमध्ये लिहिले आहे गुरू रामदासजी पृथ्वीस सांगतात, ''मुला! तू वडिलांशी का भांडतोस? जेष्ठांशी भांडण करणे चांगले नसते.''

मी हे सर्व यासाठी सांगत आहे की नंतर लोकं जमीन-जुमल्यासाठी भांडणे करतात, जे खरेतर चांगले नसते. मनुष्य एवढे सर्वकाही गोळा करूनही जगातून निघून जातो, जर तो स्वत: सोबत काहीच नेऊ शकत नाही तर मागील वारसदार कसली आशा करू शकतात? काळ कोणतीच संधी वाया

घालवीत नाही, तो आपल्या मनास भक्ती मार्गावरून भटकवितो आणि आपआपसांमध्ये वाद–विवाद निर्माण करतो.

मी माझी ही एक मुरब्बा जमीन सरकारी कार्यालयात जाऊन कायदेशीर रित्या माझ्या मुलांच्या नावे केलेली आहे, जेणेकरून माझ्यामागे यांना कोणी त्रास देऊ नये. ही मुले खरेतर या जमिनीसाठी भुकेलेली नाहीत. परंतु मी माझ्या जीवनात अनेकदा असे पाहिले आहे की नंतर जे लोक स्वत: भक्ती मार्गावरून भटकलेले असतात ते इतरांनादेखील भक्ती मार्गावरून भटकवितात.

मी माझ्या सतगुरूंच्या कृपेने माझे जीवन अतिशय प्रेमभावामध्ये व्यतीत केले आहे. मी आयुष्यभर कोणाशीही वाद–विवाद घालण्याचा प्रयत्नही केला नाही. मी माझ्या शरीराच्या कोणत्याही अवयवाचा वापर वाईट कृत्य करण्यासाठी केला नाही. अनेकदा माझ्या जीवनामध्ये माझ्यावर बरेच आरोप करण्यात आले. परंतु सतगुरू प्रेमामध्ये मी त्यांचा स्वीकार केला. माझ्या हृदयात हीच भावना नेहमी राहिली की सत्य हे सत्यच असते. त्यामुळे नेहमी सत्याच्या बाजूने उभे राहावे. हे माझ्या सतगुरू कृपालजींचे वाक्य आहे. माझ्या हृदयात कधीच कोणाचा बदला घेण्याची भावना निर्माण झाली नाही.

माझ्या मुलांना हे सांगून मला संतोष होत आहे की त्यांनी कोणाकडूनही पूजा–दान–दक्षिणा घेऊन खाऊ नये. यांच्याकडे स्वत:चा निर्वाह होऊ शकेल इतका जमीन–जुमला आहे. त्यांनी त्यांमधून स्वकमाई करून स्वत:चा उदरनिर्वाह करावा. ते सत्संग खूप आनंदाने फक्त आश्रमातच चालू ठेऊ शकतात. जर ही माझी मुले आहेत, तर त्यांनी माझ्या मागे रूदन करू नये, कारण मी कोणतेही वाईट कर्म करून चाललेलो नाही. हे मला तना–मनाने अतिशय प्रिय आहेत. आम्हाला बोलावले नाही, अंतिमसंस्कारात आम्हाला सहभागी होऊ दिले नाही असा आरोप कोणी यांच्यावर करू नये, कारण तसे करणे यांच्यासाठी अशक्य आहे. मी स्वत: त्यांना तसे करण्याची विनंती केली आहे आणि मी अपेक्षा करतो की ते त्याची पालना करतील.

स्वत:चे थडगे बनविण्यासाठी संत कधीच या जगात येत नाहीत. मी संतांच्या परंपरेला अनुसरून यांना विशेष आदेश दिला आहे की माझी आठवण म्हणून एखाद्या जागी माझे स्मारक वा समाधी बनवू नका. संतांची कोणत्याही एका जागेशी बांधिलकी नसते. ते शब्दातून येतात व शब्दातच जाऊन विलीन होतात. आपले सौभाग्य असेल तरच असे संत आपणांस भेटतात. मी नेहमी सांगतो की भूतांप्रमाणे या जगामध्ये फेऱ्या मारायच्या असतील, तर संतांकडून नाम घेण्याचा काय उपयोग? नाम जीवनाचा विमा असतो.

मी संगतसमोर हीच प्रार्थना करतो की ना मी कधी लपून राहिलो, ना माझ्या गुरूंनी मला लपू दिले. मी प्रत्येकास सढळ हाताने अध्यात्मिक संपत्ती दिली. पश्चिमेहून संगत आली तेव्हा त्यांनादेखील मी सांगितले, ''प्रियजनहो! देण्यासाठीच कृपालजींच्या कृपेचा जन्म झाला आहे, तुम्ही ती घेऊन जा. मला प्रसन्नता वाटते की त्या लोकांनी अध्यात्माचा खूप आदरमान केला.''

रसल पर्किन्स, नॉरमा फ्रेजर, बग्गा कुटुंब, डॉक्टर मौलिना, डॉन मॅकन आणि इतर अनेक प्रेमींनी मला सहकार्य केले. त्यांनी मला मनुष्य न समजता, परमात्मा स्वरूप मानले. मी सर्वांची सिफारिश माझ्या सतगुरूंसमोर करीन. ते क्षमावान दाता, कृपाळू आहेत.

हे सर्व मी कोणास त्रास व्हावा म्हणून बोललेलो नाही. माझ्या शरीराची राख माझ्या शेतात पसरवून टाकावी आणि उरलेले सामान कालव्यामध्ये वाहून द्यावे. मृत्यू अपरोक्ष स्मारक म्हणून कोणतेही माझे स्थान बनविण्याचा प्रयत्न करू नये. असा कोणी समज करून घेऊ नये की उत्तमरितीने माझे दफन केल्याने वा एखादे स्थान तयार केल्याने माझा काही फायदा होईल, असे न केल्याने माझे काही नुकसान होईल. कबीर साहेबांनी सांगितले आहे:

जे मृतक को चंदन चढाए तो मृतक से क्या फल पाए।
जे मृतक को बिष्टा में रलाए तो मृतक का क्या घट जाए।।

मी बालपणापासून सदैव हे मानत आहे:

मरना भला परदेस का यहाँ न कोई माई बाप।
न रोवे न पिटिए न कोई भया उदास।।

आज सप्टेंबर महिन्यातील ५ तारीख असून, आता रात्रीचे साधारण ९ वाजले आहेत. मी पुन्हा सांगतो की जे सत्संगी संगतमध्ये पक्के दृढनिश्चयी राहतील, त्यांचा अधिकाधिक सांभाळ केला जाईल, परंतु माझ्या अपरोक्ष ते आपआपल्या पार्ट्या बनवून विभाजित झाले तर कबीर साहेबांचे वाक्य आहे:

गुरू बेचारा क्या करे जे सिक्खन में चूक।
अंधे एक न लग्गी ज्यों बाँस बजाई ऐ फूँक।।

मी जे काही बोललो आहे, मग पूर्वेकडील वा पश्चिमेकडील प्रेमी असो, सर्वांसाठी एकच सांगणे आहे की सर्वांनी सत्यावर दृढप्रतिज्ञ रहा. कारण माझे सेवक सर्व ठिकाणी पसरलेले आहेत. माझ्याद्वारे जेवढी अध्यात्मिक साधना माझ्या सतगुरूंनी करवून घेतली आहे, जर तुम्हांस तेवढी साधना केलेला कोणी व्यक्ती भेटला तर तुम्ही आनंदाने त्यांच्याकडून अध्यात्मिक फायदा करून घ्या. त्या स्थितीत मी देखील तुमची मदत करण्यास तयार आहे. नकली गुरूच्या पाठी लागून स्वत:चे जीवन व्यर्थ घालवू नका.

महाराज सावन सिंहजींना प्रश्न विचारला गेला की जगामध्ये लोकांनी अनेक अध्यात्मिक पार्ट्या बनवून बसले आहेत, तेव्हा काय करावे? महाराज सावन सिंहजींनी उत्तर दिले,''आता तरी खूप कमी समूह आहेत. पुढे अशी वेळ येईल की शिष्य बनण्यासाठी कोणी तयार होणार नाही. सर्व जण स्वत:स गुरू म्हणवून मीच खरा कसा आहे? हे दर्शविण्याचा प्रयत्न करतील.''

मी सरकारी कागदांशिवाय प्रेम-भावनेने एक वेगळ्या प्रकारचे वारसपत्र मुखाने विदित करून जात आहे, जे संगतमध्ये कायमचे सनद बनून राहील. सर्व संगतला माझ्याकडून खूप प्रेम आणि शुभेच्छा!

***



महात्म्यांचे आगमन

सत्संग : परमसंत अजायब सिंहजी महाराज, कबीर साहेबांची वाणी
सुबोकोक्यु, कोलंबिया – १३ जून १९९५

परमपिता परमात्मा सावन कृपालजींच्या चरणी नमस्कार करतो ज्यांनी अपार दया करून आपणांस भक्तीचे दान दिले आणि त्यांचे गुणगान करण्याची संधी दिली. आपल्यापुढे स्वामीजी महाराजांची छोटीशी वाणी सादर केली जात आहे. आपण या वाणीत सत्संगाचा महिमा आणि मनुष्यजन्माचे फायदे समजावलेले आहेत व सोबत हे देखील बजावून सांगितलेले आहे की आपणांस लाभलेल्या मनुष्यजन्माची ही संधी आपणांस वारंवार मिळणार नाही. कोणत्याही व्यक्तीने परिपूर्ण महात्म्यांच्या शरणी जाण्यात विलंब करू नये. सर्व वेद–शास्त्र हेच वदन करतात की परिपूर्ण महात्मा आणि परमात्मा यांच्या दरम्यान कोणतीही भिन्नता वा अंतर नसते, तर मग आपण अशा महात्मांची शरण प्राप्त करून आपल्या घरी सच्चखंडात का पोहोचू नये?

आपल्याला जन्म–मरणाचा रोग लागलेला आहे. या संसारातून पार होण्यासाठी महात्म्यांनी दिलेले नाम हा एकच इलाज आहे. महात्म्यांनी दिलेले नाम संजीवनी बुटी प्रमाणे गुणकारी ठरते. ते सर्व आजारांवरील औषध आहे. भले संत–महात्मा पूर्वेकडील, पश्चिमेकडील अथवा इराणी देशातील असोत, भले ते कोणत्याही युगात व कोणत्याही वेळी जन्मलेले असोत आणि भले त्या सर्वांची मातृभाषा निरनिराळी असो, परंतु त्या सर्वांचे ध्येय एकच असते. ते त्याच समुद्राचे थेंब असतात ज्या समुद्रातून परमात्म्याने पहिले संत या संसारात पाठविले आणि आजही जे महात्मा शब्द–नामाची कमाई करून आपणांस शब्दाशी जोडतात व स्वत:देखील शब्दरूप झालेले आहेत, ते देखील त्याच समुद्राचे थेंब आहेत. गुरू नानकदेवजी सांगतात:

ऐके हुक्म ऐके पातशाही, जुग–जुग सरकार बनाई हे।

गुरू नानकदेवजी सांगतात की परमात्मा एकच आहे व परमात्म्याचा हुकूमदेखील युगायुगांपासून एकच आहे. संत–महात्मा परमात्म्याने पाठविलेली सरकार असते. पल्टू साहेब सांगतात:

राम के घर में काम सब सन्ते करते।
तैंतीस करोड़ देवता सन्त ते सब ही डरते।।

परमात्म्याची प्रिय मुले अर्थात संत–महात्मा हेच त्याच्या घरातील कार्यकर्ते असतात. संत परमात्म्याच्या हुकूमावरून येतात आणि परमात्म्याच्या हुकूमानुसारच वाटचाल करतात. संत एखादा नवा समाज बनवित नाहीत वा एखादा अस्तित्वात असलेला समाज नष्ट करीत नाहीत. संत प्रत्येक समाजास व प्रत्येक देशास आपले घर समजतात.

आजपर्यंत महात्म्यांचे मिशन एखाद्या वेद–पुस्तका आधारे चालले नसून, ते वेद–शास्त्रांना केवळ मार्गदर्शनाचे माध्यम म्हणून त्यांचा संदर्भ देतात की पहा प्रियजनहो, आम्ही आपणा सर्वांस परमात्म्याचा नवीन संदेश किंवा उपदेश देत नाही आहोत. आजपर्यंत जे संत या संसारात आले, त्या सर्वांचा एकच उपदेश व एकच संदेश होता.

आत्मा आणि परमात्म्याचे नाते कोणा महात्म्याने वडिल आणि मुलाच्या नात्याप्रमाणे संबोधलेले आहे, कोणा महात्म्याने स्त्री आणि तिच्या पतीच्या नात्याप्रमाणे संबोधलेले आहे तर कोणा महात्म्याने माता आणि मुलाच्या नात्याप्रमाणे संबोधलेले आहे. कोणा महात्म्याने या संसारात येऊन हा संदेश दिला की मीच या संसाराचा प्रकाश असून माझ्याद्वारेच आपण माझ्या पित्याची भेट घेऊ शकता. कोणा महात्म्याने असे देखील म्हटले आहे की ज्याने मुलाचे दर्शन केले त्याने पित्याचेही दर्शन केले. कोणा महात्म्याने असे देखील म्हटले की आपण भ्रमात पडू नका. गुरूंविना आपणांस परमात्मा लाभणार नाही, आपणांस मुक्ती मिळणार नाही. गुरू अर्जुनदेवजी महाराज म्हणतात,''ज्याने संसारात परमात्म्याच्या मुलाला आलेले पाहिले त्याने

आपला जन्म सार्थकी लावला, तो जन्म–मरणाच्या बंधनातून स्वतंत्र झाला.'' कबीर साहेब सांगतात:

राम कबीरा एक भए हैं कोई न सके पछानी।

मी आणि राम एक झालेलो आहोत. आता मी आणि राम यांमध्ये काही फरक राहिला नाही. कोणी हे देखील ओळखू शकत नाही की यांमधील राम कोण आहे व कबीर कोण आहे? गुरू गोविंद सिंहजी सांगतात:

सन्त समूह अनेक मति के।

संत–महात्मा जेव्हा–जेव्हा या संसारात आले, त्यांची समजावण्याची पद्धत व भाषा निरनिराळी जरी असली व ते निरनिराळ्या समाजातून जरी आले असले तरी त्यांचे सांगणे केवळ हेच होते की,''परमात्मा एकच आहे व त्यास प्राप्त करण्याचा मार्ग देखील एकच आहे, तो सर्वांच्या अंतर्यात आहे व त्याची भेट आपण केवळ अंतर्यात जाऊनच घेऊ शकतो. कोणी कितीही शिकला–सवरलेला बुद्धीमान पंडित असला तरी त्यास परमात्मा प्राप्तीचे ज्ञान व मार्ग गुरूंखेरीज मिळू शकत नाही, अंधारात भटकत असलेल्या आपल्या आत्म्यास कधीही योग्य मार्ग सापडू शकत नाही.''

वेद–शास्त्र आपणांस परमात्मा प्राप्तीचे फायदे व त्याचे नाम प्राप्त करण्याचे फायदे दर्शवतात. ते हे देखील सांगतात की आपणांस एखाद्या परिपूर्ण संत–महात्म्यांकडूनच नाम मिळते. परंतु तरीही आपण वेद–शास्त्र वाचून परमात्म्यास प्राप्त करू शकत नाही. जसे आपण आजारी असताना एखाद्या चांगल्या डॉक्टरांनी लिहिलेले पुस्तक वाचू लागलो, त्या पुस्तकात रोगही लिहिलेले असतात व त्यावरील इलाजदेखील लिहिलेला असतो, आपण ते पुस्तक जरी दिवसभर वाचून त्याचे पठण करीत राहिलो, तरी आपला आजार काही दूर होणार नाही. जोपर्यंत आपण एखाद्या वर्तमानातील डॉक्टरांकडे जाऊन स्वत:वर इलाज करीत नाही तोपर्यंत आपला आजार दूर होत नाही. डॉक्टरांना पूर्ण ज्ञान असते, त्यांनी प्रॅक्टीस केलेली असते म्हणून आपणांस

जीवीत डॉक्टरांची गरज असते. त्याचप्रमाणे परमात्म्यास प्राप्त करण्यासाठी आपणांस एखाद्या जीवित महापुरूषांच्या चरणी जाण्याची गरज असते.

गुरू कृपाल मेरे घर आना (२)
जैसे तुम सावन दिवाने, मैं तेरा दिवाना, (२) (२)

१. एक बार भी सच्चे मन से, जिसने तुझे ध्याया,
भर-भर झोली दोनों हाथों, तुमने प्यार लुटाया, (२)
मेरी डोर तुम्हारे हाथों, तुम मेरे जीवन साथी,(२)
तुम भक्तों के भक्त तुम्हारे, ठिक नहीं मुझको ठुकराना,(२)
मैं तेरा दिवाना...

२. शिबरी के जूठे बेरों से प्यारे, तुमने मजा उठाया,
दुर्योधन के मेवे तज के, साग विदुर का खाया, (२)
केवल दास नहीं हूँ सतगुरु, मैं दासों का दास तुम्हारे,(२)
जैसे सबकी लाज रखी है, मेरी भी लाज रखाना (२)
मैं तेरा दिवाना...

३. कैसे तुम्हें बुलाऊं सतगुरु, पता नहीं है ज्ञान नहीं,
किसी तरह का कोई तुकब्बर, मेरे बस की बात नहीं, (२)
पल-पल के दर्शन को गुरु जी, प्यासी आंखें तरस रही हैं,(२)
यही बेनती है 'अजायब' की, मुझे नहीं तड़पाना (२)
मैं तेरा दिवाना...

स्वामीजी महाराज प्रथम सत्संगाविषयी समजावतात व नंतर मनुष्यजन्माचे फायदे समजावतात. ते हे देखील समजावतात की मनुष्यजन्म वारंवार मिळणार नाही. संतमत हा एखादा समाज वा धर्म आहे असा समज करून घेऊ नये. संतमत तर स्वत:चा सुधार करण्याचा मार्ग आहे.

जेव्हा आपण आपले सर्व दोष त्यागतो तेव्हाच आपण स्वत:स सुधारलेले आहोत असे समजावयास हवे. गुरू अर्जुनदेवजी सांगतात,''जेव्हा आपल्या

अंतरातील इतरांप्रती असलेली ईर्षा नाहीशी होते, इतरांप्रती असलेला मत्सर समाप्त होतो. आपणांस मित्र व शत्रू या दोहोंच्या अंतरात एकच परमात्मा दिसू लागतो, त्यावेळी आपण समजावे की आपल्यावर सत्संगाचा परिणाम झालेला आहे.''

जेव्हा मित्र व शत्रू दोहोंच्या अंतरात एकच परमात्मा असेल तर आपण कोणाची निंदा करू शकत नाही. आपली अहंकारापासून सुटका होते कारण सर्वांना देणारा तो परमात्माच असतो. जर परमात्म्याने एखाद्यास स्वखुशीने काही दिले तर आपण ईर्षा का करावी? एकदा का आपण आपल्या अंतरात गुरूंची मुर्ती, गुरूस्वरूप पाहिले, त्यानंतर आपणांस आपले प्रिय गुरू सर्वांच्या अंतरात दिसू लागतात. खरेतर आपण गुरूंना पाहून आश्चर्यचकीत होतो की बाह्यजगात तर ते एका मनुष्यदेहात आहेत परंतु त्यांचे मनमोहक स्वरूप प्रत्येकाच्या अंतरात दिसू लागते. गुरू अर्जुनदेवजी महाराज सांगतात:

बिसर गई सब तात पराई जब ते साध संगत मोहे पाई।
न को वैरी न ही बेगाना सगल संग हमको बन आई।
सब में रव रहा प्रभ ऐको पेख पेख नानक बिगसाई।।

स्वामीजी महाराज सांगतात,''आपण सत्संगात जाता तेव्हा अशाप्रकारे सत्संग ऐका की ज्यामुळे आपले मन निर्मळ होईल. आपण आपल्या मनास समजावण्यासाठी सत्संगात जातो. जर आपले मन विषय-विकारांमध्ये गुरफटून राहात असेल, घर-गृहस्थीतील कामात गुंतलेले असेल वा संसारिक व्यक्तींशी भांडत फिरत असेल आणि आपले तन महात्म्यांच्या सत्संगात घेऊन आपण बसलेला असलात तर आपल्या आत्म्यावर व मनावर सत्संगाचा रंग कसा काय चढेल?'' कबीर साहेब सांगतात:

मन दिया कहीं और को तन साधा के संग।
कहे कबीर कैसे लगे कोरी गज्जी रंग।।

करो री कोई सतसंग आज बनाय।।
नर देही तुम दुर्लभ पाई। अस औसर फिर मिले न आय।।



स्वामीजी महाराज सांगतात,''आपणांस मनुष्यदेह खूप चांगली सुवर्णसंधी लाभलेली आहे, हा वारंवार मिळणार नाही. पशु–पक्षी, गाई–म्हशी, घोडे–साप इत्यादी सर्व जनावरे सत्संग ऐकू वा समजू शकत नाहीत. देवी–देवतांच्या देखील नशीबी महात्म्यांचा सत्संग नसतो, ते मनुष्यजन्माची अभिलाषा करतात की आम्हांसही मनुष्यजन्म मिळावा व आम्हीही परिपूर्ण महात्म्यांच्या संगतीत जाऊन नामदान प्राप्त करावे.'' कबीर साहेब म्हणतात:

इस देही को सिमरे देव, सा देही भज हर की सेव।
भजो गोविंद भूल मत जाओ, मानस जन्म का ऐही लाहो।।

आपण सांगता फळ पिकून जमीनीवर पडल्यानंतर आपण कितीही प्रयत्न केला तरी त्या फळास फांदीवर पुन्हा लावू शकत नाही. कबीर साहेब सांगतात:

मानस जन्म दुर्लभ है होत ना बारम्बार।
ज्यों वन फल पके भौंहे गिरे बोहर ना लग्गे डार।।

माशास कोळ्याने पसरलेल्या जाळ्याची जाणीव नसते, तो खूप आनंदात नदीच्या तरंगात पोहत असतो. परंतु जेव्हा तो कोळ्याच्या जाळ्यात सापडून त्याचा खिमा–खिमा बनविला जातो व त्यास लोकांच्या पोटात जावे लागते, तेव्हाच त्यास यागोष्टीचा उलगडा होतो. प्रियजनहो, जरी आपण आपल्या मृत्युस विसरून निर्धास्तपणे बसलो असलो तरी मृत्युदेवता ते विसरत नाही. आपणांस कल्पना नाही की कधी व कोणत्या ठिकाणी आपला अपघात होईल, कधी श्वासांची श्रुंखला थांबेल व कधी मृत्युची घंटी वाजेल?

तिरिया सुत धन धाम बड़ाई। यह सुख फिर दुख मूल दिखाय।।

स्वामीजी महाराज आपणांस प्रेमाने सांगतात की आपण येथे सुखासाठी साधन बनविलेले आहेत. स्त्री पुरूषास जीवनसाथी बनवून परमात्म्यास विसरून गेलेली आहे. तसेच पुरूष स्त्रीला जीवनसाथी बनवून तो तिच्यापासून सुख प्राप्त करीत असतो. त्याला वाटते की कदाचित ही खुशी सदैव राहिल, चांगले महाल बनविले आहेत मी जेथे सदा राहीन. जेव्हा मृत्यु येतो तेव्हा पती जातो व पत्नी पहात रहाते तसेच पत्नी जाते तेव्हा पती पहात रहातो. आपली मुले–बाळे आपल्या सोबत जात नाहीत इतकेच काय आपले शरीर देखील आपल्या सोबत जात नाही. फरीद साहेब सांगतात:

कित्थे तैंडे माँ प्यो जिन्हीं तू जंणया ओए।
तें पासों ओ लद गए तू अजे न पतिन्या ओए।।

येथे आपले आई–वडील, आजोबा–पणजोबा ज्या घरांवर, तसेच पति–पत्नीशी तर बाप आपल्या मुलांवर प्रेम करीत होते. परंतु मृत्युनंतर ते सर्व सामान इथेच सोडून गेले. जर त्यांच्यासोबत काही गेले नाही तर मग आपण कसली आशा ठेवून बसलो आहोत की आपण यांचा विमा करून घेऊन जाऊ. आपणांस वाटते कदाचित ते या गोष्टी येथे विसरून गेले आहेत परंतु आपण जाताना यागोष्टी जरूर सोबत घेऊन जाऊ. कबीर साहेब सांगतात:

कहे कबीर चले जुआरी दोए हाथ झाड़।

ज्याप्रमाणे जुगारी जुगारामध्ये सर्वकाही हरल्यानंतर सायंकाळी रिकाम्या हाती परत घरी येतो, तशीच आपली देखील अवस्था आहे. मनुष्य मुठ बंद करून जन्म घेतो आणि रिक्त हाताने जगातून निघून जातो.

या से बचो गहो गुरू सरना। सतसंग में तुम बैठो जाय।।

स्वामीजी महाराज सांगतात,''जर आपण काळाच्या तावडीतून मृत्युच्या पंजातून स्वत:चा बचाव करू इच्छित असाल तर परिपूर्ण महात्मांच्या शरणी जाण्यास विलंब करू नका. महात्मांच्या संगतीत जाताना विचार करीत बसू नका, आपणांस जी संधी मिळते तेव्हा त्यांच्या संगतीचा फायदा घ्या.''

यह सब खेल रैन का सुपना। मैं तुम को अब दिया जगाय।।

स्वामीजी महाराज तसेच इतर सर्व संत या जगास व सांसारिक गोष्टींची रात्रीच्या स्वप्नाशी तुलना करतात. आपणांस रात्री थोड्या वेळासाठी स्वप्न पडते ज्यास आपण सत्य मानतो. जेव्हा आपले डोळे उघडतात तेव्हा तेथे काही नसते. आपले जीवन दहा, वीस, पन्नास अथवा शंभर वर्षांचे असते. शेवटी जेव्हा मृत्यु येतो तेव्हाच आपले नेत्र उघडतात.

झूटी काया झूटी माया। झूटा मन जो रहा लुभाय।।

स्वामीजी महाराज सांगतात,''आपली काया खोटी असून ती नाशिवंत आहे. ती वाळूच्या भिंतीप्रमाणे आहे. माया वृक्षाच्या छायेसमान आहे जी आज या ठिकाणी तर उद्या दुसऱ्या ठिकाणी आहे. आपले मनदेखील खोटे आहे जे आपणांस यांमध्ये संमोहित करून ठेवते. हा सर्व मनाने रचलेला खेळ आहे.''

सतसंग सच्चा सतगुरू सच्चा। नाम सचाई क्या कहुँ गाय।।

स्वामीजी महाराज सांगतात,''कोणती वस्तू खरी आहे? खरी म्हणजे जी कधी नाश होत नाही, जिचा कधी विनाश होऊ शकत नाही. नामरूपी महात्मा खरे असतात, त्यांची संगत खरी असते, जी नाशिवंत नसते, जिचा कधी विनाश होत नाही.'' नामाचा महिमा वर्णिला जाऊ शकत नाही, कारण

असे महात्मा नामातूनच येतात, नामाचाच प्रचार करतात आणि नामातच जाऊन विलीन होतात. आपण जी गोष्ट लाटेच्या सुपुर्द करतो ती समुद्राच्या तळाशी जाऊन बसते.

मान बचन मेरा तू सजनी। जन्म मरन तेरा छुट जाय।।

स्वामीजी महाराज शरीरातील निद्रावस्थेत कैद असलेल्या आत्म्यास संदेश देतात की हे प्रिय मुली, तू माझे म्हणणे ऐक. तू परिपूर्ण महात्मांच्या शरणी जाऊन नामदान प्राप्त कर. महात्मांच्या संगतीत जाण्यासाठी आळस करू नकोस. तुझ्या जन्म-मरणाचा चक्रनेमिक्रम समाप्त करण्यासाठी महात्मा परमात्म्याच्यावतीने आलेले असतात.

नभ चढ़ चलो शब्द में पेलो। राधास्वामी कहत बुझाय।।

स्वामीजी महाराजांनी या छोट्याशा वाणीत आपणांस प्रेमाने समजावले आहे की आपण सत्संग एकाग्रचित्ताने ऐकून समजण्याचा प्रयत्न करावा. ज्या मनास समजावायचे आहे त्या मनासदेखील सत्संगात घेऊन बसावे. सत्संगात येऊन आपल्यात जे दोष आहेत त्यांचा आपण त्याग करावा व स्वत:चा सुधार करावा. आपली काया खोटी आहे, सांसारिक गोष्टी खोट्या आहेत आणि आपले मन आपणांस त्यात संमोहित करून बसलेले आहे. त्यागोष्टी सत्य आहेत असे आपणांस प्रतीत करवीत आहे, ते स्वत: खोटे आहे.

परिपूर्ण महात्मा सत्यवान आहेत. त्यांची संगत सत्य आहे. महात्मा आपणांस नामदानरूपी भेट देतात. नाम सत्य आहे, नाम नाशिवंत नसून नामाचा कधीही विनाश होत नाही.

अखेरीस स्वामीजी महाराज एकच उपदेश देतात की आपण महात्मांच्या शब्द-नामाच्या नावेत बसून या संसाररूपी भवसागरापार होऊन आपल्या घरी म्हणजे सच्चखंडात पोहोचावे.

***

धैर्यवान बना व योग्य वेळेची प्रतिक्षा करा

परमसंत अजायब सिंहजी महाराजांच्या मुखकमलातून संगतसाठी एक महत्वपूर्ण संदेश, न्युयॉर्क – २५ जुलै १९८०

आपल्यामधील बहुतेक लोकांनी हा कार्यक्रम सफळ बनविण्यासाठी खूप परिश्रम घेतले. हा कार्यक्रम गुरूंची दया व आपल्या परिश्रमामुळे सफळ होऊ शकला. मी आपल्या सर्वांचा आभारी आहे आणि आपल्या प्रेमपूर्वक व अंत:करणापासून केलेल्या सेवेसाठी आपल्या सर्वांचा धन्यवाद करतो.

आपणा सर्वांना माहितच आहे की माझे स्वत:चे कोणतेही मिशन नाही. मी आपले कोणतेही मिशन साध्य करण्यासाठी सर्वत्र फिरत नाही. महाराज कृपालजींचे हे मिशन आहे आणि मी जे काही करीत आहे ते आपल्या गुरू महाराज कृपालजींसाठी करीत आहे. महाराज कृपालजींनी मला जे प्रेम दिले आहे, मी केवळ ते प्रेम व त्यांचा संदेश देण्यासाठीच येथे आलेलो आहे.

मी कित्येकदा सांगितले आहे की परमात्मा कृपाल प्रेमाचा सागर आहेत. मी प्रेमाचा भक्त आहे. त्यांनी मला प्रेम दिले आणि सांगितले की, मी प्रेमींकडे जाऊन त्यांना हे प्रेम द्यावे. संसारात प्रेम वाटण्याखेरीज माझे वेगळे कोणतेही मिशन नाही. हे प्रेम मला माझ्या प्रिय कृपालजींकडून मिळालेले आहे. जेव्हा आपण शब्द–नामाची साधना करून स्वत:वर दया करतो तेव्हाच आपण त्यांचे नावरूपास आणतो, त्यांचे गुणगान करू शकतो.

गुरू नानकदेवजींनी आपले शिष्य गुरू अंगददेवजींना परमार्थात सर्वसंपन्न केले परंतु गुरू नानकदेवजींनी देहत्याग केल्यानंतरही गुरू अंगददेवजी गुरू नानकदेवजींच्या एका जुन्या सत्संगीसोबत रहात असत की जेणेकरून त्या शिष्याकडून गुरू नानकदेवजींविषयी काही गोष्टी त्यांस ऐकण्यास मिळाव्यात.

एके दिवशी गुरू कृपालजींनी मला म्हटले, मी जंगलात राहू इच्छित होतो, मी एक त्यागी होतो. मला जंगलात किंवा ओसाड जागी राहणे पसंद होते. परंतु मी ते सर्व यासाठी करू शकलो नाही कारण मला माझ्या गुरू

सावनजींनी तसे करण्यास मनाई केली होती. महाराज सावन सिंहजींनी आपल्या अंतसमयी मला बोलावून सांगितले होते,''ऐक कृपाल, या संसारात पारमार्थिक सिद्धांत समजावणारे अनेक लोक सापडतील, परंतु या संसारात तुझ्यासारखा दुसरा कोणीही नाही जो या पारमार्थीक सिद्धांतांचे प्रात्यक्षिक करून दाखवू शकेल आणि या सत्याचा सर्व संसारात प्रचार करू शकेल. तू माझे सांगणे लक्षात ठेव, मी दिलेल्या शिकवणुकीला प्रचलित ठेव. माझी शिकवण या संसारातून नाहीशी होऊ नये.''

महाराज कृपाल सदैव एका मालकाच्या दोन नोकरांची गोष्ट सांगत असत. एक नोकर मालकाचे गुणगान करीत असे आणि मालकास पाहताच त्याच्यासमोर काम करण्यास तत्परता दाखवित असे, परंतु मालक गेल्यानंतर काही काम करीत नसे. दुसरा नोकर बागेची राखण करीत असे आणि मालक नसतानाही अगदी हृदयापासून काम करीत असे. आता तुम्ही विचार करून पहा! मालक कोणत्या नोकरावर प्रसन्न होईल? त्याचप्रमाणे जेव्हा आपले गुरू निघून गेले आहेत, त्यांच्या जाण्यानंतर आपल्यावर खूप जबाबदाऱ्या आहेत. त्यांनी आपणास करण्यासाठी जे काम दिलेले आहे, ते म्हणजे ध्यान-अभ्यास. आपण ध्यान-अभ्यास करावयास हवा व सर्व मनुष्यांवर तसेच प्राणीमात्रांवर जास्तीत-जास्त प्रेम करावयास हवे.

मला या संसारात कसलीही रुची नाही, कारण मी कधीही सांसारिक गोष्टींमागे आकर्षित झालो नाही. मी माझ्या जीवनातील मौल्यवान हिस्सा जमीनीखाली बसून परमात्म्याची भक्ती करण्यात घालविला. मी परमात्म्यास कधीही विसरलो नाही. आपण सर्व जाणताच की मी कसा बाहेर आलो. रसेल पर्किन्स खूप मेहनतीने अडचणींना तोंड देत माझ्याकडे पोहोचला व त्याने मला बाहेर आणले. आपणांस माहीत आहे की हे सर्व काम किती कठीण होते. मी नेहमी विचार करीत असे की मी कधीही बाहेर येणार नाही कारण मला या संसारात कसलीही रुची नाही.

जेव्हा मी बाहेर आलो तेव्हा मी रसेल पर्किन्सला म्हटले,''आपणांस माहीत आहे की ज्याने ध्यान–अभ्यास केलेला आहे त्यासच ध्यान–अभ्यासाची किंमत माहीत असते. ध्यान–अभ्यासाची पुंजी गमावणे फार सोपे असते. जर तुमची इच्छा असेल की मी बाहेर यावे तर मी बाहेर येईन परंतु तुम्हास मला वचन द्यावे लागेल की तुम्ही कधीही कोणाची निंदा करणार नाही.''

मी रसेल पर्किन्सवर खूप खुष आहे कारण त्याने दिलेले वचन पाळले. त्याने कधीही कोणाची निंदा वा निर्भर्त्सना केली नाही. आपण संत बानी मासिक वाचता, त्यात तुम्हाला इतरांप्रती निंदेचा एकही शब्द आढळणार नाही.

माझ्या प्रिय गुरू कृपालजींनी मला सांगितले होते की जर वाईट मनुष्य दुष्कृत्य करणे सोडत नाही तर भल्या मनुष्याने सत्कृत्य करणे का सोडावे?'' स्वार्थी लोक सदैव निमित्त शोधत असतात व स्वत: खरे आहोत असे सिद्ध करण्यासाठी वाद–विवाद करतात, परंतु बुद्धीमान लोक तसे करीत नाहीत. ते योग्य वेळेची वाट पाहातात. आपणही बुद्धीमान लोकांप्रमाणे योग्य वेळेची वाट पाहावी. कोण खरा आहे हे योग्य वेळी आपोआपच उघडकीस येते.

आपण धैर्यवान बनावे आणि योग्य वेळेची प्रतिक्षा करावी. आपण आपला ध्यान–अभ्यास करीत रहावा. आपण त्या लोकांविषयी विचार करू नये जे अयोग्य मार्गी जात आहेत. त्यांना जाऊ देत. वेळ आल्यावर ते पुन्हा योग्य मार्गी लागतील, गुरू त्यांना योग्य मार्गावर आणतील.

आपल्यासाठी असे म्हणणे कठीण आहे की महाराज कृपालजी गेल्यानंतर त्यांचा कोणी परिपूर्ण शिष्य या जगात नाही. जर आपण असे म्हटले तर याचा अर्थ असा होतो की आपल्या गुरूंकडे नामाचा खजिना होता परंतु ते स्वत:प्रमाणे परिपूर्ण असा एकही शिष्य बनवू शकले नाहीत. जर आपण असे म्हटले की महाराज कृपालजींनंतर त्यांचा कोणीही परिपूर्ण शिष्य नाही तर आपण त्यांच्याप्रती कृतघ्नता व बेईमानी करीत असू आणि आपल्यासाठी ते चांगले नाही.



आमचे प्रिय गुरू कृपाल भक्तीचे राजाधिराज होते, आपण सर्व विश्वाचे मालक होता. हे सत्य आहे की स्वयं परमात्मा कृपालजींचे शरीर धारण करून आला व येऊन आपल्यासोबत राहिला. ज्या प्रेमींनी महाराज कृपालजींचे सांगणे ऐकून त्यांच्या शिकवणीनुसार आपले जीवन घडविले, त्यांनी महाराज कृपालजींकडून या संसारात येण्याचा लाभ घेतला.

आपण संसारात त्यांचे मिशन प्रचलित ठेवले पाहिजे, त्यांचे नावरूपास आणले पाहिजे, त्यांच्या आज्ञेचे पालन केले पाहिजे. आपल्या अंत:करणात एकमेकांसाठी प्रेम असले पाहिजे, कारण आपण सर्व त्यांच्या प्रेमात त्यांच्या नावाच्या आश्रयाखालची त्यांची मुले आहोत. मी पुन्हा तुम्हा सर्वांचा धन्यवाद करतो की आपण हृदयापासून ध्यान–अभ्यास करीत आहात.

***

निरोप संदेश

परमसंत अजायब सिंहजी महाराजांद्वारे कार्यक्रमा अखेरीस प्रेमींना
दिलेला संदेश – जयपूर, राजस्थान – १५ मार्च १९९४

मी सर्वप्रथम आपले गुरूदेव परमात्मा सावन–कृपालजींचा धन्यवादी आहे ज्यांनी आपणा सर्वांस त्यांच्या स्मरणात बसण्याची संधी दिली. ही त्या महान महापुरूषांचीच कृपा आहे की आपणांस परमात्म्याच्या स्मरणात समरस होऊन बसण्याचे सौभाग्य प्राप्त झाले, त्यांच्या आठवणीत कार्यक्रम खूप चांगल्या रितीने व्यतीत झाला.

आपणांस कल्पना आहे की गेल्या वेळी जेव्हा मी जयपूरला आलो होतो तेव्हा माझ्यामुळे आपल्या अंत:करणाला खूप ठेच पोहोचली होती कारण मी खूप आजारी पडलो होतो व कार्यक्रमाच्या मध्यंतरी मला रुग्णालयात दाखल व्हावे लागले. या कार्यक्रमात देखील माझे हृदय खूप त्रस्त होते परंतु कृपाळू परमात्मारूप कृपालजींनी कृपा केली व मी खूप प्रेमाने व श्रद्धाभावाने आपली सेवा करू शकलो, म्हणून मी वारंवार त्यांचे धन्यवाद करतो.

त्यांच्या दयेने आपल्यासोबत काही दिवस व्यतीत करून मला खूप आनंद झाला. संतांना आपली संगत स्वत:च्या जीवापेक्षाही प्रिय असते. संतांना सत्संगी मुलांपासून दुरावणे आवडत नाही परंतु संत सांगतात, आपल्या कर्मांना अनुसरून ज्या कौटुंबिक जबाबदाऱ्या आपल्याला मिळालेल्या आहेत, त्या आपण परिपूर्ण कराव्यात. संत कधीही आपली मुले–बाळे व पत्नीला सोडून परमार्थ साधण्याचा सल्ला देत नाहीत. ते सांगतात स्वत:च्या घरी राहात असता परमात्म्याच्या भक्तीसाठीदेखील वेळ द्यावा.

मी प्रत्येक सत्संगात महाराज कृपालजींच्या उद्‌गारांची आठवण करून देतो की,''शंभर कामे सोडून तुम्ही सत्संगास जा व हजार कामे सोडून तुम्ही ध्यान–अभ्यासास बसा. आपण जोपर्यंत आपल्या आत्म्यास त्याचा आहार देत नाही तोपर्यंत आपल्या शरीरास आहार देऊ नका. शरीराचा आहार अन्न आहे व आत्म्याचा आहार ध्यान–अभ्यास व शब्द–नामाची कमाई आहे.''

आपला आत्मा कमजोर आहे. आपण एकमेकांचे डिबचणे सहन करू शकत नाही, त्रस्त होतो याचे कारण असे की आपल्या अंतरात आत्मिक बळ नाही. जर आत्मिक बळ असते तर आपण सहनशील व धैर्यवान असतो. परंतु आपण अध्यात्मात कंगाल झालेलो आहोत. आपण दररोज नित्यनेमाने जर शब्द–नामाची कमाई केली, तर आपल्या अंतरात धैर्य, आत्मिक बळ व सहनशक्ती यांसारखे गुण आपोआपच उत्पन्न होतील. जर आपल्या पूर्वकर्मांमुळे आपल्यावर एखादा कठीण प्रसंग जरी आला, तरी आपण त्या घटनेस परमात्म्याची मर्जी मानून तो सहन करू. खरेतर परमेश्वर इच्छेनुसार घडणारी घटना कधीही टळत नाही, तर मग त्या घटनेस प्रेमाने का भोगू नये? सर्व संतांनी संसारात वारंवार कळकळीने हाच संदेश दिला:

घट घट में हर जिओ, बसया सन्तन कहयो पुकार।

गुरू तेग बहादूर साहेब सांगतात,''प्रत्येक स्त्री–पुरूष, पशू–पक्षी, प्रत्येक देशात व जातीत परमात्मा सामावलेला आहे.''

आपल्या सर्वांना परमात्म्यास प्राप्त करण्याचे साधन व पद्धत समजावली गेलेली आहे. मी आशा करतो की आपण सर्व आपआपल्या देशात जाऊन श्रद्धेने व प्रेमाने शब्द–नामाची कमाई कराल.

येथे जयपूरच्या प्रेमींनी सत्संगाच्या कार्यक्रमात तन, मन व धनाने सेवा केली, सहकार्य केले त्यासाठी मी त्यांचा आभारी आहे. ज्यांनी बाहेरून येऊन इथे साफ–सफाईची सेवा केली, स्त्रियांनी लंगर तयार केला व पुरूष–बांधवांनी संगतला लंगर वाढले, मी त्या सर्व प्रेमींचादेखील आभारी आहे. कधीकधी प्रेमींच्या हातून सेवा करताना चूक होते. मी आशा करतो की कोणीही येथून कोणत्याही सेवादाराप्रती नाराजी वा राग घेऊन जाऊ नये, केवळ प्रेमच घेऊन जावे. एकमेकांचा आदर करणे प्रत्येक सत्संगीचे कर्तव्य आहे.

परतीचा प्रवास सर्वांनी नामस्मरण करीतच करा. जर तुम्ही वाटेत गप्पा–गोष्टी केल्यात वा इतरांच्या निंदा–नालस्ती केली तर समजा की काळ शक्तीने तुम्हाला भक्तीमार्गावरून भमीत केले आहे. त्यामुळे आपण

या कार्यक्रमात जे काही भक्ती–धन कमावलेले आहे, त्यावर काजळाचा लेप वा पडदा चढविला जाईल. मी आपल्या सर्वांचा परतीचा प्रवास सुखरूप होवो अशी शुभेच्छा देतो व अशी आशा करतो की परमात्मा कृपाल जेव्हा कधी पुन्हा संधी देतील तेव्हा अशाच प्रकारे आपण सर्व एकत्रित येऊन प्रेमाने सेवा करू. आपण या कार्यक्रम स्थळी येण्यापूर्वी जशी स्वच्छता येथे केलेली असते, तशीच स्वच्छता येथून जाण्यापूर्वी तुम्ही करावी, जेणेकरून येथील लोकांना देखील कळावे की आपणा सर्वांस संतांनी स्वच्छतेच्या जबाबदारीविषयी किती सविस्तर समजावलेले आहे.

मी नेहमी सांगतो की आर्मीने भले वाळवंटात तळ मांडला असला तरी जेथे आर्मीतील सैनिक तंबू लावून एखादी रात्र काढतात, तेथेदेखील ते अत्यंत शिस्तीत रहातात, तेथे बोर्ड लावतात की आम्ही येथे तळ मांडलेला आहे. तेथे आपले पहारेकरी देखील नेमतात. जेव्हा ते तेथून निघून जातात तेव्हा ते त्या जागेस नीट साफ करून पूर्वीप्रमाणे नीटनेटकी बनवून जातात. जसे शेतकरी शेतात हवे तिथे घाण टाकतात तसे ते करीत नाहीत.

जेव्हा मी अमेरिकेच्या पहिल्या दौऱ्यावर गेलो होतो, तेव्हा मी तेथे आजारी पडलो. तेथील प्रेमींना वाटले की संतांना राजस्थानातील फोटो दाखवावे जेणेकरून हिंदुस्थानातील फोटो पाहून यांच्या हृदयास धैर्य मिळेल. त्यात एक असा देखील फोटो होता जसे आपल्या हिंदुस्थानात लोकांना सवय असते की ते उघड्यावरच शौचविधी करतात. त्या फोटोतील मनुष्य मलोत्सर्गासाठी वस्त्रहीन बसलेला होता. जेव्हा तो फोटो आला तेव्हा तेथील एक मनुष्य हसून म्हणू लागला हा हिंदुस्थानचा संडास आहे.

प्रियजनहो, मी हिंदुस्थानात जन्मलो आहे. संतांच्या हृदयात सर्व देशांप्रती आदर असतो, ते सर्व देशांना आपला देश समजतात. परंतु ज्यादेशात त्यांचा जन्म झालेला असतो, त्यादेशाप्रती त्यांचा जास्त कल असतो की आपल्या देशातील लोकांना कोणी नाव ठेवू नये.

***

खरे खोटे

परमसंत अजायब सिंहजी महाराजांनी संगतला सांगितलेली एक गोष्ट

एक पंडित राजदरबारात कथा कथन करीत असे. तो राजाचा दरबारी पंडित होता. एके दिवशी कथा कथन केल्यानंतर त्याची नजर राजकन्येवर पडली. त्याच्या मनात विचार आला की मी या राजकन्येस कसे प्राप्त करू शकेन? आपणांस कल्पना आहेच की वाचक ज्ञानींची काय परिस्थिती आहे? जेव्हा कामाग्नी भडकतो तेव्हा त्यांचे सर्व तत्वज्ञान गायब होते.

पंडित घरी परतताना ह्याच विचारात मग्न होता. दुसऱ्या दिवशी जेव्हा तो पंडित कथा कथन करण्यासाठी आला तेव्हा तो उदास व त्रस्त होता. राजाने त्यास विचारले,''पंडितजी, तुम्ही उदास का आहात?'' सुरवातीस तर पंडित गप्प राहिला. राजाने पुन्हा प्रेमाने विचारल्यावर तो म्हणाला,''मी काय सांगू. लहान तोंडी मोठा घास, मी माझ्या ज्योतिषविद्येद्वारे पाहिले आहे की तुमच्यावर खूप कठीण साडेसाती येणार आहे, ज्यामुळे तुम्हास खूप त्रास होईल. मी आपले मीठ खाल्ले आहे, मी आपणांस दु:खी कसे पाहू शकतो?

राजाने विचारले,''याचा काही उपाय सांगा.'' पंडित म्हणाला,''याचा उपाय आहे, परंतु तुम्हाला तो उपाय करणे खूपच अवघड आहे.'' राजाने म्हटले,''पंडितजी, तरीही तुम्ही मला सांगा.'' पंडित म्हणाला,''एका चांगल्या हवाबंद पेटाऱ्यात आपली राजकन्या व त्यासोबत तिला जो काही हुंडा–धन–सोने–नाणे द्यायचे असेल आणि काही दिवसांपुरते भोजन–पदार्थ ठेवून त्या पेटाऱ्यास नदीत सोडून दिले तर तुमची साडेसाती दूर होईल.'' राजाने त्याच रात्री पंडिताने सांगितल्याप्रमाणे पेटारा बनवून नदीत सोडून दिला व त्याविषयी कोणालाही सांगितले नाही.

पंडिताने आपल्या साथीदारांना सांगितले की नदीत जो पेटारा वाहून चाललेला आहे त्यात खूप सोने–नाणे आहे, आपण तो बाहेर काढून आणू. जेव्हा त्यांनी पेटारा नदीबाहेर काढून आणला तेव्हा पंडित त्यांस म्हणाला की जर आपण हा पेटारा आत्ताच उघडला तर कोणीतरी बघेल. आपण यास लपवून ठेवूया व दोन–तीन दिवसांनंतर उघडूया.

तेथे एक राजा शिकार करण्यासाठी आला असता त्याने पाहिले की येथे जंगलात हा पेटारा कशासाठी लपवून ठेवलेला आहे? जेव्हा राजाने पेटारा उघडला तेव्हा पाहिले की त्यात एक सुंदर राजकन्या बसलेली आहे. राजकन्येने पंडिताचे सर्व कारस्थान राजाला सांगितले. राजाने त्या पेटाऱ्यातून राजकन्या व त्यात ठेवलेले सर्व सोने–नाणे–धन काढून घेतले आणि त्याच्याकडे एक अस्वल होते, ते अस्वल त्याने पेटाऱ्यात कैद केले.

पंडित रात्री एकटाच आपली काम–वासनापूर्ती करण्यासाठी जंगलात आला. पेटाऱ्यात कैद केलेले अस्वल चवताळले होते. पंडिताने पेटारा उघडताच अस्वलाने त्यावर झेप घेतली आणि पंडितास खाऊन टाकले. राजकन्येचे परमात्म्याने रक्षण केले, तिला राजाच्या घरी पाठविले. खरेतर पंडितास माहीत होते की खोटे बोलणे चांगले नाही, परंतु तरीही तो कामाग्नीच्या लालुचेपोटी खोटे बोलण्यावाचून राहू शकला नाही.

***

धन्य अजायब

परम संत अजायब सिंहजी महाराजांच्या मधुर आठवणीतील
संत बानी आश्रम, राजस्थान येथील सत्संगाच्या कार्यक्रमांची माहिती

संत–बानी आश्रम, १६ पी एस राजस्थान येथील सत्संगाचे कार्यक्रम

५ ते ७ ऑगस्ट २०१६

७ ते ११ सप्टेंबर २०१६

२८ ते ३० ऑक्टोबर २०१६

२५ ते २७ नोव्हेंबर २०१६

२३ ते २५ डिसेंबर २०१६

***

त्रुटी नोंद

गेल्या जून महिन्यातील अजायब बानी मराठी मासिकाच्या पृष्ठ क्रमांक २८ वरील शेवटच्या परिच्छेदातील पहिल्या वाक्यात राहिलेल्या चुकीची वाचकांनी नोंद घ्यावी:

चुकीचे वाक्य : संत–महात्मा आपणांस कधीच घर–दाराचा त्याग करण्यास, जग–रहाटी सोडण्यास सांगतात.

बरोबर वाक्य : संत–महात्मा आपणांस कधीच घर–दाराचा त्याग करण्यास, जग–रहाटी सोडण्यास सांगत नाहीत.

झालेल्या चुकीबद्दल परमसंत अजायब सिंहजी महाराज आणि सर्व संगतचे आम्ही क्षमस्व आहोत, तेव्हा उदार मनाने माफी द्यावी हीच इच्छा.